जि.प.वेबसाईटवर प्रसिध्द करणेसाठी सविस्तर जाहिरात नमुना

# राष्ट्रीय आरोग्य अभियान कोल्हापूर

## कंत्राटी पदभरती जाहिरात दिनांक :११/०६/२०२३

अर्ज कालावधी दि.१२/०६/२०२३ ते दि.२०/०६/२०२३.

राष्ट्रीय आरोग्य अभियान कोल्हापूर अंतर्गत खालील प्रमाणे कंत्राटी पदे भरावयाची आहेत.

| Sr.No. | Cadre | Name of Post | Place of Posting | Age (Upper Limit) | Total No.of Posts | Category | Essential Qualification | Essential Experience | Remuneration ( In Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Specialist | Physician | 1) Sub District Hospital Kodoli<br>2) Vasaht Rugnalay Gandhinagar | 70 Years and Below | 2 | No Reservation | MBBS<br>MD (Medicine) | Relevant Post Govt. and Private Experience (Minimum 1 Year) | Rs.75000/- |
| 2 | | Radiologist | Indira Gandhi General Hospital Ichalkaranji | | 1 | | MBBS &<br>MD In Radiology/ DMRD/DNB | | Rs.75000/- |
| 3 | | Anesthetist | 1) Sub District Hospital Murgud<br>2) Rural Hospital Ajara<br>3) Rural Hospital Khupire<br>4) Rural Hospital Malkapur<br>5) Rural Hospital Radhanagari | | 5 | | MBBS &<br>MD/MS/DA/DNB Anesthesia | | Rs.75000/- |
| 4 | Programm Manager | District Consultant | Civil Surgeon, CPR Hospital Kolhapur | Upto 38 Yr for Open Category, Upto 43 Yr for Reserved Category | 1 | SC-1<br>VJA-1<br>OBC-1<br>EWS-1 | Any Medical Graduate with MPH/MHA/ MBA in Health | Relevant Post Govt. Experience (Minimum 1 Year) | Rs.35000/- |
| 5 | | CPHC Consultant | District Health Officer Zilha Parishad Kolhapur | | 1 | | Any Medical Graduate with MPH/MHA/ MBA in Health | | Rs.35000/- |
| 6 | | District Programm Coordinator (NCD) | Civil Surgeon, CPR Hospital Kolhapur | | 1 | | Any Medical Graduate with MPH/MHA/ MBA in Health | | Rs.35000/- |
| 7 | | District Quality Assurance Coordinator | District Health Officer Zilha Parishad Kolhapur | | 1 | | Any Medical Graduate with MPH/MHA/ MBA in Health | | Rs.35000/- |

| Sr.No. | Cadre | Name of Post | Place of Posting | Age (Upper Limit) | Total No.of Posts | Category | Essential Qualification | Essential Experience | Remuneration ( In Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | Programm Coordinator | EMS Coordinator | Civil Surgeon, CPR Hospital Kolhapur | | 1 | VJA-1 | Any Post Graduation Degree | | Rs.20000/- |
| 9 | Medical Officer | Medical Officer (Male) | Rural Hospital Chandgad | | 1 | EWS-1 | MBBS / BAMS | | Rs.28000/- |
| 10 | | Medical Officer (Female) | 1) Rural Hospital Ajara<br>2) Rural Hospital Chandgad | | 2 | EWS-1<br>VJA-1 | MBBS / BAMS | | Rs.28000/- |

सविस्तर जाहिरात व अर्जाचा विहित नमुना कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या https://www.zpkolhapur.gov.in/barti-2019/ या वेबसाईटवर प्रसिध्द करणेत आला आहे. इच्छुक उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित सत्य प्रतीसह विहित नमुन्यातील अर्ज राष्ट्रीय आरोग्य अभियान कक्ष, २ रा मजला, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर ४१६००३ येथे दि.१२/०६/२०२३ ते दि.२०/०६/२०२३ रोजी पर्यंत (कार्यालयीन सुट्टी वगळता) कार्यालयीन वेळेत सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वा. पर्यंत स्विकारण्यात येतील. सविस्तर जाहिरातीस अनुसरुन विहित नमुन्यातील परिपुर्ण अर्ज सादर करणेची जबाबदारी संबधित उमेदवारांची असुन अपुर्ण अर्ज ग्राहय धरला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

## अटी व शर्ती

१) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची आहेत.

२) सदरची पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही. तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही. तसेच अर्जदाराला शासकिय नियमित सेवेत सामावून घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबधी दावा करण्याचा अधिकारी राहणार नाही.

३) अर्जदार हा संबधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारा विरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

४) जाहिराती मधील रिक्त पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो तसेच रिक्त ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो. याबाबतचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.कोल्हापूर यांनी राखुन ठेवले आहेत.

५) केवळ शासकीय अनुभव ग्राहय धरणेत येईल.

६) एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करावयाचा असल्यास उमेदवारांनी प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज सादर करावेत.

७) एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करताना अर्जा सोबत, पदांचा प्राधान्यक्रम मुलाखतीचे पुर्वी कार्यालयास सादर करावा.

८) निवड प्रक्रियेतील पात्र/ अपात्र उमेदवारांची यादी, अंतिम निवड यादी तसेच वेळोवेळी देणेत येणाऱ्या सुचना इ. जिल्हा परिषद कोल्हापूरच्या **https://www.zpkolhapur.gov.in/barti-2019/** या संकेत स्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करणेत येईल. याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारांसोबत केला जाणार नाही.

९) निवड यादीतील गुणाक्रमांकाचे आधारे प्राधान्य क्रमाने पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवाराने कुठल्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवारांची निवड रदद करण्यात येईल.

१०) जाहिरातीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे राहील.

११) उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाच्या संख्ये नुसार अर्जाची छाननी करुन गुणानुक्रमे यादी तयार करण्यात येऊन गुणवत्ते नुसार निवड करण्यात येईल.

१२) उमेदवारास कंत्राटी कालावधीत सोईनूसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१३) उपरोक्त पदांकरीता तत्सम कौन्सिलचे अद्ययावत रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. अन्यथा उमेदवारांस मुलाखतीस अपात्र ठरविले जाईल.

१४) भरती प्रक्रिया स्थगित करणे / रदद करणे / पद भरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकरी यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत.याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

१५) **इच्छुक उमेदवारांचे विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित सत्य प्रतीसह आपले अर्ज राष्ट्रीय आरोग्य अभियान कक्ष, २ रा मजला, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर येथे दि. १२/०६/२०२३ ते दि.२०/०६/२०२३ रोजीपर्यंत (कार्यालयीन सुट्टी वगळता) कार्यालयीन वेळेत सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वा.पर्यंत स्विकारण्यात येतील.**

१६) सदर भरतीची प्रक्रिया पुर्ण झालेनंतर एक वर्षाच्या आत एखादया ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमूळे पद रिक्त झालेस प्रतीक्षा यादी वरील उमेदवारास नियुक्ती आदेश दिले जाईल.

१७) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी **रु.१५०/- चा** डिमांड ड्राप्ट व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांनी **रु.१००/- चा** डिमांड ड्राप्ट (DD) जोडणेआवश्यक/ अनिवार्य आहे व डिमांड ड्राप्टच्या मागे स्वतःचे नाव व पद स्वहस्ताक्षरात लिहावे, सदरचा डिमांड ड्राप्ट (DD) **“District Integrated Health & Family Welfare Society, Kolhapur”** या नावाने देय असलेला असावा. चेक/धनादेश अथवा बॅंकेत पैसे भरलेची स्लिप ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१८) परिपुर्ण अर्ज सादर करणेची जबाबदारी संबधित उमेदवाराची असुन अपुर्ण अर्ज ग्राहय धरला जाणार नाही, अपात्र करणेत येईल याची नोंद घ्यावी.

१९) सदरहू भरती प्रक्रियेकरीता अर्ज सादर करणेची मुदत दि.२०/०६/२०२३ अखेर राहणार असून तदनंतर अर्जाची छाननी, लेखी परिक्षा /मुलाखत प्रक्रिया, निवड यादी प्रसिध्द करणे, हरकती / आक्षेप प्राप्त करुन घेणे व त्या निकाली काढणे आदी रीतसर शासनाच्या तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान कडील प्राप्त मार्गदर्शक सुचनां नुसार भरती प्रक्रिया पार पाडुन निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देणेत येईल. याबाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या https://www.zpkolhapur.gov.in/barti-2019/ संकेतस्थळावर (Website) प्रसिध्द करणेत येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. याबाबत पुनश्च वर्तमानपत्रामध्ये जाहिरात दिली जाणार नाही. त्याकरीता उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय कोल्हापूर कार्यालयाकडील ०२३१-.२६५६६१७ या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधु शकतात.

** खालीलप्रमाणे आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती अर्जा सोबत जोडाव्यात.

१) शैक्षणिक अर्हते बाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका २) शाळा सोडल्याचा /जन्म तारखेचा दाखला ३) प्रमाणित केलेले केवळ शासकीय अनुभव प्रमाणपत्रे ४) पासपोर्ट आकाराचा फोटो

सही/-

सदस्य
निवड समिती तथा
जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक
एनएचएन जि.प.कोल्हापूर

सही/-

सदस्य
निवड समिती तथा
जिल्हा शल्यचिकित्सक
सी.पी.आर कोल्हापूर

सही/-

सदस्य-सचिव
निवड समिती तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, कोल्हापूर

सही/-

अध्यक्ष
निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA NHM राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र | **राष्ट्रीय आरोग्य अभियान कोल्हापूर**<br>कंत्राटी पद भरती जाहिरात दिनांक : ११/०६/२०२३ | सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन |

................................ या पदासाठी अर्ज

| पासपोर्ट आकाराचा उमेदवाराचा नजीकचा साक्षांकित फोटो |
|---|

(फोटोवर उमेदवारांची स्वाक्षरी)

प्रति,
मा.मुख्य कार्यकारी अधिकारीसो,
जिल्हा परिषद कोल्हापूर

**संपूर्ण नाव मराठी इंग्रजी (कॅपीटल लेटर)**

१) आडनाव .................. ..............................

२) स्वत:चे नाव .................. ..............................

३) वडिलांचे /पतीचेनाव .................. ..............................

४) आईचेनाव .................. ..............................

पत्र व्यवहाराचा संपुर्ण पत्ता पिनकोड सहीत

....................................................................

....................................................................

.................................................पिनकोड-

मोबाईल क्रमांक ................................ईमेल आयडी-................................

५) जन्म तारीख

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

६) दि. ३१/०५/२०२३ रोजीचे वय

| वर्षे | महिने | दिवस |
|---|---|---|
| | | |

७) कोणत्या प्रवर्गासाठी अर्ज केलेला आहे त्याप्रमाणे (√) अशी खुन करावी.

| अ.जा. | अ.ज | वि.जा.अ | भज (ब) | भज (क) | भज (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व | एसईबीसी | आर्थिकमागासप्र वर्ग | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SC | ST | VJ-A | NT-B | NT-C | NT-D | SBC | OBC | SEBC | EWS | Open |
| | | | | | | | | | | |

८) शैक्षणिक अर्हता :

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परीक्षा | विदयापीठ/ मंडळाचे नाव | परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |
| ६ | | | | | |

९) अनुभव

| अ. क्र. | संस्थेचेनाव व पत्ता | कालावधी | | एकुण कालावधी दिवस महिने वर्ष |
|---|---|---|---|---|
| | | पासुन | पर्यंत | |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |

१०) माझे विरुध्द न्याय प्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंग विषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालू आहे / नाही असल्यास थोडक्यात तपशिल.....................................

.........................................................................................

११) अर्जा सोबत खालील (छायांकित) सत्य प्रती जोडलेल्या आहेत.

१) शैक्षणिक अर्हते बाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका (बंधनकारक) २) जातीचे प्रमाणपत्र ३) शाळा सोडल्याचा /जन्म तारखेचा दाखला ४) प्रमाणित केलेले केवळ शासकीय अनुभव प्रमाणपत्रे ५) पासपोर्ट आकाराचा फोटो ६) महाराष्ट्र कौन्सिलचे वैध रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र.

१२) अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी आहे काय ? होय/ नाही.

मी असे प्रमाणित करतो / करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असून, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करणेत येईल आणि माझे विरुध्द कायदेशी रकारवाई होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण : अर्जदाराची सही :

दिनांक : अर्जदाराचे नाव : (................................................)